नि. फौ. ख. क्र.१०१/२०११ निशाणी १६७

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.६ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – अशोक नामदेवराव चाटी,

वय – ६४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

पत्ता – रा. शिवाजी नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**फिर्यादी तर्फे वकिल श्री. एल. एस. बेदरकर यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी सन २००७ ते २०१५ या कालावधीमध्ये पो.स्टे., उरळ येथे हे.कॉ. म्हणून कार्यरत होतो. मी सुनिता ताथोड हिस ओळखतो तसेच मी सदर प्रकरणातील आरोपींना ओळखतो, परंतु त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. सन २०११ या वर्षी सुनिता ताथोड ही पो.स्टे., उरळ येथे आली होती व तीने सांगितले की, तिला आरोपीने शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली, त्या माहितीवरुन मी स्टेशन डायरीला तशी नोंद घेतली व तिचा जबाब नोंद केला व अदखलपात्र गुन्हा दाखल केला. आता मला दि.२३.०३.२०११ रोजीचे अदखलपात्र गुन्ह्याची सत्यपत्र दाखविण्यात आली, त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे, सदर अदखलपात्र गुन्ह्यास **आर्टीकल १** देण्यात येत आहे. सदर अदखलपात्र गुन्हा दाखल केल्यानंतर फिर्यादीला मी माझ्या सहीचे समजपत्र दिले होते. आता मला सदर दि.१५.०५.२०११ चे समजपत्र दाखविण्यात आले, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.१६८** देण्यात येत आहे. सदर प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याबाबत फिर्यादी हिस समज देण्यात आली होती.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांचे मार्फत उलटतपासः**

२. आता मला नि.क्र.१६८ कडील समजपत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर समजपत्रावर पो.स्टे.चा शिक्का तसेच त्यावर आवक–जावक क्रमांक नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे समजपत्र मी फिर्यादीच्या मागणीवरुन न्यायालयात तयार करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुनिता ताथोड हिने सन २०११ मध्ये पो.स्टे.उरळ येथे किती रिपोर्ट दाखल केले याबाबत मला काही सांगता येणार

नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी पो.स्टे. येथे हजर राहावे या कामी मी त्यांना कधीही नोटीस दिली नव्हती, त्यामुळे मी आरोपींना कधीही पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुनिता ताथोड हिने दि. २३.०३.२०११ रोजी अदखलपात्र गुन्ह्याची माहिती दिली आणि त्यावरुन मी गुन्हा नोंद केला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०२.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.02 17:05:00 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०२/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०२/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०२/०१/२०२६ |